सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तहसिल कार्यालय, अमरावती
# निवासी नायब तहसीलदार शाखा

**शाखा प्रमुख –**
**श्रीमती.टीना चव्हाण ,**
**निवासी नायब तहसीलदार**
**(अतिरिक्त कार्यभार )**

# निवासी शाखेतील कर्मचारी

- माहिती अधिकार शाखा प्रमुख ➡ श्रीमती.दुर्गा कुकडे स.म.अ
- संदर्भ शाखा प्रमुख ➡ श्रीमती.प्रिया चौधरी म.स.
- आर.आर.सी. शाखा प्रमुख ➡ श्री.आशिषकुमार साव म.स
- नायब नाझर शाखा प्रमुख ➡ श्री.अविनाश खाडे म.स
- संगणक परिचालक ➡ श्री.प्रितम.पाचपोर

श्री.पंकज पेटे

# निवासी शाखेतील विषय

**श्रीमती.दुर्गा कुकडे**
**महसूल सहय्यक अधिकारी**
**यांचा कडील विषय**

*माहिती अधिकार
*अपिलीय प्रकरणे.
*करमणुक कर.
*ऑनलाईन पोर्टल.
*लोकशाही दिन.
*ओळख परेड.
*जागा मागणी प्रकरणे.
*प्रधानमंत्री आवास योजना.
*सरफेसी ॲक्ट.
*किसान सन्मान योजना
* व इतर कामकाज

**श्री.प्रितम पाचपोर**
**संगणक परिचालक**
**यांचा कडील विषय**

*प्रधानमंत्री आवास योजना.
*सरफेसी ॲक्ट.
*किसान सन्मान योजना
*मा.श्री.तहसिलदार साहेब यांचा आदेशान्वये इतर कामकाज

**श्री.पंकज पेटे**
**संगणक परिचालक**
**यांचा कडील विषय**

*जागा मागणी प्रकरणे
*मा.श्री.तहसिलदार साहेब यांचा आदेशान्वये इतर कामकाज

**श्रीमती.प्रिया.चौधरी**
**महसूल सहाय्यक**
**यांचा कडील विषय**

*मुख्यमंत्री सहायता निधी.
*पाणी टंचाई
*पुनर्वसन.
*सभेची टिपणी.
*क्षतीपुर्ती योजना.
*अंशकालीन कर्मचारी.
*प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र.
*दादासाहेब गायकवाड
*स्वाभिमान सबळीकरण योजना.
*जातीय दंगल.
*सोलेशिअम फंड.
*भूसंपादन
*मानव निर्मात आपत्ती
*व इतर कामकाज

# निवासी शाखेतील विषय

**श्री.आशिषकुमार साव**
**महसूल सहाय्यक**
**यांचा कडील विषय**

*अं.ले.प.
*ओळख परेड,
*जनगणना,
*आरआरसी,
*कलम 107 ची प्रकरणे,
*कायदा व सुव्यवस्था व
*भूदान जमीन
*भुदान यज्ञ मंडळ,
*फौजदारी प्रकरणे.
*AGपरीच्छेद
*व इतर कामकाज

**श्री.अविनाश खाडे**
**महसूल सहाय्यक**
**यांचा कडील विषय**

*नायब नाझर,
*कार्यालयीन देखरेख.
*मा.श्री.तहसिलदार साहेब यांचा आदेशान्वये इतर कामकाज

• .

# निवासी शाखेतील सर्व विषयांची प्रस्तावना पुढील प्रमाणे

१. माहीती अधिकार:-

माहीतीचा अधिकार म्हणजे, कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयाकडे असलेली माहीती मिळवण्याचा हक्क. हा हक्क प्रत्येक नागरीकाला आहे. माहीतीचा अधिकार कायदा,२००५ अंतर्गत या हक्काची तरतुद आहे.लोकशाही ख-या अर्थाने लोकांसाठी काम करणे.

माहीतीचा अधिकार कायदयातील तरतुदी:

* माहीतीसाठी अर्ज केल्यापासुन ३० दिवसाच्या आत  माहीती मिळावी

* माहीतीच्या अधिकाराच्या (RTI) अर्जाला ३० दिवसाच्या आत उत्तर दिले नाही, तर ते उल्लंघन मानले जाते.

* कोणत्याही नागरीकाला वैयक्तीक माहीती देणे बंधनकारक असणार नाही.

* ज्या माहीतीमुळे व्यक्तीच्या गोपनियतेमध्ये अनावश्यक हस्तक्षेप होईल,ती माहीती देण्यात येणार नाही.

* माहीती मिळवण्यासाठी अर्ज करण्यासाठी,महाराष्ट्र शासनाच्या आरटीआय पोर्टलचा वापर करता येतो.

- **अपिलीय प्रकरणे:-**
- माहीतीचा अधिकार २००५ अंतर्गत  ज्या अधिकाया-कडुन माहीती मागितली होती,त्या अधिका-याने दिलेला निर्णय किंवा माहीती नाकारल्याचा निर्णय मिळाल्यावर, प्रथम अपीलीय अधिका-याकडे कलम १९(१) जोडपत्र-ब अन्वये अपील दाखल करता येते.
- * प्रथम अपीलीय अधिका-याने निर्णय दिल्यानंतर किंवा ३० दिवसाची मुदत संपल्यास, ९० दिवसाच्या आत राज्य माहीती आयोगाकडे किंवा केंद्रीय माहीती आयोगाकडे अपील दाखल करता येते

- **करमणुक कर:-**
- करमणुक कर म्हणजे मनोरंजनासाठी शुल्क आकारणे,ज्यामध्ये चित्रपट,नाटक,संगीत कार्यक्रम इत्यादीचा समावेश होतो. या कर आकारणीसाठी महाराष्ट्र शासनाने मुंबई करमणुक शुल्क अधिनियम,१९२३ बनवला आहे, या कायदयात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. जसे की सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्र.६, सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्र.१३, सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्र.२, आधी सन १९४८चा मुंबई अधिनियम क्र.२३. या कायदयानुसार,मनोरंजनाचे आयोजन करणा-या व्यक्ती किंवा संस्थेकडुन कर आकारला जातो.

- **ऑनलाईन पोर्टल: -**
- आपले सरकार योजना सन २०२० हे महाराष्ट्र शासनाचे एक वेब पोर्टल आहे.,जे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ नुसार नागरीकांना विविध शासकीय सेवा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देते.
- 'आपले सरकार' पोर्टलची वैशिष्ट्ये:
- * **ऑनलाईन अर्ज:** घरबसल्या विविध शासकीय सेवांसाठी ऑनलाईन अर्ज करता येतात.
- * **पारदर्शकता:** सेवा पुरवठा प्रक्रियेत पारदर्शकता आणि कार्यक्षमतेवर भर दिला जातो.
- * **वेळेची बचत:** कमीत कमी कागदपत्रांच्या मदतीने ऑनलाईन अर्ज करता येतात, ज्यामुळे वेळ आणि
- पैशाची बचत होते.
- * **सेवा शुल्क:** सेवा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरता येतात.
- * **घरपोच सेवा:** अर्ज प्रक्रियेनंतर आवश्यक प्रमाणपत्रे/दाखले घरपोच मिळतात.
- * **तक्रार निवारण:** तक्रार निवारणासाठी 'आपली तक्रार' या पर्यायाचा वापर करता येतो.

- **लोकशाही दिनः-**
- शासन परीपत्रक क्र.प्रसुधा २०११/ प्र.क्र.१८९/१८-अ/ दिनांकः-२६सप्टें.२०१२अन्वये, लोकशाही दिनासंबधी यापुर्वी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रकेअधिक्रमित केली आहे. सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी/ अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडुन सोडवणुक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणुन सर्व शासकीय कार्यालयीन स्तरावर "लोकशाही दिन" राबविण्यात येते.
- लोकशाही दिन वरील शासन परीपत्रकानुसार पुढीलप्रमाणे राबविण्यात येते.
- * तालुका स्तर- प्रत्येक महीन्याचा तिसरा सोमवार.
- * जिल्हाधिकारी/महानगरपालीकाआयुक्त स्तर - प्रत्येक महीन्याचा पहीला सोमवार.
- * विभागीयआयुक्त स्तर - प्रत्येक महीन्याचा दुसरा सोमवार.
- वरीलप्रमाणे प्रत्येक स्तरावर "लोकशाही दिन" म्हणुन पाळण्यात येते. या दिवशी सार्वजनिक सुटी असल्यास, त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस म्हणुन पाळण्यात येतो.
- अर्ज स्विकृतीचे निकषः- १. लोकशाही दिनाकरीता अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी व दोन प्रतीत पाठविणे आवश्यक असावा
- . २. तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची असावी.

# प्रधानमंत्री आवास योजना.




"सर्वांसाठी घरे -२०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख :- १७ नोव्हेंबर, २०१८

# प्रधानमंत्री आवास योजने साठी लागणाऱ्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. अतिक्रमण करण्यात आलेले भुखंड कमाल १५०० चौ. फुटाच्या मर्यादितच नियमानुकूल करण्यास पात्र राहतील
२. अतिक्रमणे नियमानुकूल करतांना अनुसूचित जाती/अनुसूचीत जमाती/इतर मागासवर्गीय प्रवर्गातील अतिक्रमण धारकाकडुन कब्जेहक्काच्या रकमेची आकारणी करण्यात येऊ नये.
३. उर्वरित प्रवर्गाच्या बाबतीत पहिल्या ५०० चौ.फु. क्षेत्रापर्यंत कब्जेहक्काच्या रकमेची आकारणी करण्यात येऊ नये. मात्र उर्वरित प्रर्वगाच्या बाबतीत अतिक्रमण नियमानुकूल करत असतांना, ५०० चौ.फु. पेक्षा अधिक परंतु १००० चौ.फु. पर्यंत जमिनीच्या वार्षिक दर मुल्य तक्त्यातील दरानुसार येणा-या किंमतीच्या १० टक्के आणि १००० चौ.फु. पेक्षा अधिकच्या क्षेत्रासाठी अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर मुल्य तक्त्यातील दरानुसार येणा-या किंमतीच्या २५ टक्के एवढी रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारण्यात यावी.
४. अनुदानग्राही, उक्त जमिनीच्या कब्जेहक्काची रक्कम यादीत नमुद असल्याप्रमाणे तहसिलदार, अमरावती यांचे कडे भरणा करेल.
५. अनुदानग्राही उक्त जमिनीच्या आकारणीची रक्कम प्रत्येक वर्षी अनुदानकर्त्यास देईल. वेळोवेळी होणा-या बदलानुसार सुधारित आकारणीची रक्कम अनुदानग्राही यांना भरणा करणे बंधनकारक राहील.
६. अनुदानग्राही मंजूर करण्यात आलेली जमीन च्भोगवटदार वर्ग-२छ व सर्वासाठी घरे २०२२ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभधारक असा शेरा उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडील अभिलेखात इतर शेऱ्यामध्ये नोंद करतील.
७. अनुदानग्राही, उक्त अधिनियमाच्या व त्याअन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधानुसार हाती घेण्यात आलेल्या फेर जमाबंदीत आकारणीमध्ये वाढ करण्यात येईपर्यंत पासुन उक्त आकारणीची रक्कम देईल.

- ८. जिल्हाधिका-यांच्या परवानगीशिवाय, निवासी प्रयोजनाखेरीज कोणत्याही इतर प्रयोजनासाठी अनुदानग्राही, उक्त जमिनीचा वापर करणार नाही.
- ९. अनुदानग्राही, त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये उक्त जमीनीच्या संबंधात लादता येतील असे सर्व कर, दर व उपकर व आयातकर देईल.
- १०. अनुदानग्राही, उक्त जमिनीचा त्याच्या कब्जास, लागू असेल तेथेवर उक्त अधिनियम व त्या अन्वये त्यावेळी अमलात असलेले सर्व नियम व आदेश यांच्या उपबंधाचे पालन करील.पात्र
- ११. हया अनुदानाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याच्या बाबतीत, अनुदानग्राही, अधिनियम व त्या अन्वये केलेले नियम यात तरतूद केलेल्या शास्तीस पात्र ठरेल.नील
- १२. सदर जागेचा वापर दुकान, गाळे बांधणे व इतर प्रयोजना करीता करता येणार नाही.क्षारत
- १३. मंजुर प्रयोजनाव्यतिरीक्त इतर प्रयोजनासाठी वापर करावयाचा असल्यास शासनाची पुर्व परवानगी घेणे आवेदकास बंधनकारक राहील.न्य गूनर,T-
- १४. जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगीशिवाय उक्त जागा गहाण, हस्तांतरण करता येणार नाही.
- १५. मंजुर करण्यात आलेल्या जागेवर बांधकाम करण्यापुर्वी स्थानीक विकास नियमावली नुसार व जिल्हाधिकारी / स्थानिक प्राधिकरण यांची परवानगी घेतल्याशिवाय बांधकाम करु नये तसेच बांधकाम नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.
- १६. लगतच्या भुखंडधारकाचे अथवा जनतेचे सुविधाधिकार (राईट ऑफ इजमेंटचे, वहिवाट, उजेड, वायु जिवन इत्यादी) हक्क बाधीत होणार नाही याबाबत आयुक्त, महानगरपालिका यांनी खात्री करावी.
- १७. आयुक्त, म.न.पा., अमरावती यांनी प्रश्नाधिन जमिनीची मोजणी करुन त्यानुसार क्षेत्र ताब्यात देण्याची कार्यवाही तहसिलदार, अमरावती व उपअधिक्षक भूमि अभिलेख, अमरावती यांचे मदतीने करावी.
- १८.सहसिलदार, अमरावती यांनी जमिनीचा ताबा देण्यापुर्वी उपविभागीय अधिकारी, अमरावती यांनी निश्चित केलेली रक्कम शासकीय खजीण्यात भरणा करुन घेवुन शासनाच्या अटी व शर्ती मान्य * असल्याचे सबंधिताकडुन लेखी अभिप्रमाणित हमीपत्र घ्यावे. ज्या प्रयोजनाकरीता जमिन मंजुर करण्यात येत आहे जिचा वापर आदेशापासुन १ वर्षाचे आत उपयोगात आणने बंधनकारक राहील.
- १९. उपविभागीय अधिकारी, अमरावती यांनी जमिनीचा ताबा देतांना विहीत नमुन्यातील सनद देण्याची करण्याची कार्यवाही करावी.

- २०. ज्या विशीष्ट प्रयोजनासाठी जमिन देण्यात आली असेल त्या प्रयोजनासाठी उक्त जमिन वापरण्यात आली
नाही तर किंवा ज्या प्रयोजनासाठी ते विशीष्ट प्रयोजन किंवा प्रयोजनाव्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात आली असेल किंवा राज्य शासनास स्वतःच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी हि जमिन आवश्यक वाटेल तर उक्त जमिन तिच्यावर बसविण्यात आलेल्या वास्तु व बांधकाम यासह राज्य शासन परत घेईल आणि उक्त जमिन अशा प्रकारे आवश्यक असल्याबद्दलचे सबंधित अधिका-यांचे स्वाक्षरीचे हे प्रतिग्रहीता व राज्य शासन यांच्यात निर्णायक असेल.
- २१. राज्य शासन/जिल्हाधिकारी ती जमीन कोणत्याही वेळी परत घेईल तर त्यासाठी द्यावयाची भरपाई (त्या जमिनीच्या प्रतिग्रहणार्थ), राज्य शासनाला देण्यात आलेली रक्कम कोणतीही असल्यास व प्रतिग्रहित्याने त्या जमिनीवर अधिकृतरित्या उभारलेली किंवा पाडलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम यावर (ति जमिन) परत घेण्याचे वेळी आलेला खर्च किंवा त्याची किंमत यापैकी ती रक्कम कमी असेल ती रक्कम यापेक्षा अधिक असणार नाही या शर्ती अन्वये द्यावयाच्या भरपाईच्या रकमेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास तो वाद राज्य शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात येईल.
- २२. शासनाचे सर्व संबंधीत प्रचलीत व वेळोवेळी निर्गमित होणारे नियम अर्जदरास बंधनकारक राहतील.
- २३. जमीनीचा ताबा संबंधीता देण्यापुर्वी उपविभागीय अधिकारी, अमरावती यांना अतिक्रमण धारकांकडुन विहीत नमुन्यातील संमतीपत्र तसेच नमुना-चौदा (नियम ४३ (अ) (सहा) पहा) अन्वये करारनामा करुन घेणे आवश्यक आहे.
- २४. ज्या अतिक्रमणधारकाने या योजनेचा लाभ घेण्याच्या द्रुष्टीने अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी इच्छा व्यक्त केली आहे परंतु अशा अतिक्रमण धारकाचे अतिक्रमित क्षेत्र १५०० चौ.फु. पेक्षा जास्त आहे, अशा अतिक्रमणधारकाने १५०० चौ.फु. पेक्षा जास्त असलेले त्याचे अतिक्रमण स्वतः निष्काषीत केल्याशिवाय अशा अतिक्रमण अतिक्रमण नियमानुकूल करण्यात येऊ नये, याची दक्षता आयुक्त, म.न.पा. यांनी घ्यावी.
- २५. अतिक्रमण नियमानुकूल करण्यापूर्वी अशा अतिक्रमित जागेपैकी रस्ता, गटारे, पाणीपुरवठा यासारख्या अत्यावश्यक मुलभूत सोयीसुविधांसाठी आवश्यक असलेले क्षेत्र कोणत्याही मोबदल्याशिवाय संबंधित

- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे वर्ग करण्याची हमी संबंधीत अतिक्रमणदाराकडुन लेखी स्वरुपात घेतल्याशिवाय असे अतिक्रमण नियमानुकूल करु नये.
- २६. मंजूर करण्यात आलेल्या जमिनीबाबत / अतिक्रमणाबाबत मा. न्यायालयानी दिलेले आदेश अनुदानग्राही यांना बंधनकारक राहील.
- २७. यापुढे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत शासकीय जमिनीवर अतिक्रमण होणार नाही, याबाबत आयुक्त, म.न.पा. अमरावती यांनी दक्षता घ्यावी. यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्या. तसेच अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास, त्याबाबत आयुक्त, म.न.पा. अमरावती यांनी निष्कासनासाठी आवश्यक कार्यवाही करावी.
- २८. वितरीत करण्यात आलेल्या भुखंडाची अधिकार अभिलेख व महानगरपालीका, अमरावती यांचेकडे नोंद करतांना " प्रधानमंत्री आवास योजनेकरिता सर्वांसाठी घरे योजनेअंतर्गत लाभार्थी " अशी सुस्पष्ट नोदं करण्यात यावी.
- २९. उपविभागीय अधिकारी अमरावती यांनी क्षेत्रफळाजी खारतजमा करून पट्टेवाटपाची कार्यवाही करावी

# दि सिक्युरीटायझेशन ॲक्ट.

**दि सिक्युरीटायझेशन ॲक्ट २००२ चे कलम १४ नुसार गैरअर्जदार यांनी बॅकेस गहान करुन देण्यात आलेल्या स्थायी संपत्तीचा ताबा घेण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेशाची अमंलबजावणी करण्याबाबत.**

## जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांचे न्यायालय

**Case No. MRC-81/ 22-2023 , Amravati.**

दि सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १४ नुसार.

अर्जदार :-

विरूध्द

गैरअर्जदारः-

### आदेश

(पारीत दिनांक -

अर्जदार

तर्फे प्राधिकृत अधिकारी यांचे दिनांक- ११/१०/२०२२ रोजी दाखल केलेल्या अर्जान्वये सुरु करण्यात येऊन पंजीबध्द करण्यात आले आहे.अर्जदार बँकेने अर्जासोबत (१) दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अक्ट २००२ चे कलम १३ (२) अंतर्गत गैरअर्जदार यांना दिलेली मागणी नोटीस व सदर नोटीस गैरअर्जदार यांना पाठविण्यात आलेली असल्याबाबत पोस्ट खात्याकडील स्विकृतीची प्रत व सदर नोटीस वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आलेली असल्याबाबत वृत्तपत्राचे कात्रणाची प्रत, (२) दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अक्ट २००२ चे कलम १३ (४) ची ताबा नोटीसची प्रत व सदर नोटीस वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाल्याबाबत वृत्तपत्राची कात्रणाची प्रत, (४) गहाणखत,(५) लोन ॲग्रीमेंट,(६) बँक खात्याचे विवरणपत्राची प्रत व इतर संबंधित दस्तऐवजांच्या छायांकित प्रती जोडण्यात आलेल्या आहेत.

---

**OFFICE OF THE TAHSILDAR AMRAVATI**
**Morshi Road Amravati Near Taluka**
**Administrative Building Cultural Bhavan**
**Tel No.0721-2575522**
**E-mail:- tah.amravati@gmail.com**

तहसिलदार अमरावती यांचे कार्यालय
तालुका प्रशासकीय इमारत सांस्कृतिक
भवन जवळ मोर्शी रोड अमरावती
दुरध्वनी :- ०७२१-२५७५५२२
ई मेल:- tah.amravavti@gmail.com

क्र.अका / एमआरसी-८१ / कवि - -२०२५

दिनांक :- / / २०२५

प्रति

१.

विषय - दि सिक्युरीटायझेशन ॲक्ट २००२ चे कलम १४ नुसार प्र.क्र. MRC-८१ / /२०२४-२०२५ आदेश दि. ...../...../२०२५ नुसार गैरअर्जदार यांनी बँकेस गहान करुन देण्यात आलेल्या स्थायी संपत्तीचा ताबा घेण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेशाची अमंलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ - १) अर्जदार ........................................ तर्फे प्राधिकृत अधिकारी यांचा अर्ज दिनांक–

२) ........................................ यांचा अर्ज दिनांक–

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दि सिक्युरीटायझेशन ॲक्ट 2002 चे कलम 14 नुसार प्र.क्र. MRC-८१ /......./२०२४-२०२५ आदेश दि. ..... / .... /२०२५ नुसार गैरअर्जदार यांनी बँकेस गहान करुन देण्यात आलेल्या स्थायी संपत्तीचा ताबा घेण्याकरीता मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेशान्वये गैरअर्जदार यांनी गहाण ठेवलेल्या मिळकतीचा ताबा गैरअर्जदाराकडुन अर्जदार यांना देण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत..

करिता सदर प्रकरणात दिनांक – ....... /........ / २०२५ रोजी कार्यवाही करण्यात येणार असुन सदर प्रकरणा बाबत एखादया न्यायालयाचा स्थगिती आदेश असल्यास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावे. अन्यथा कार्यवाहीचे वेळी आपण स्वतः न चुकता उपस्थित राहावे.

तहसिलदार अमरावती

**प्रतिलिपी** -संपर्क अधिकारी ........................................ यांना आवश्यक कार्यवाही करीता.यांनी उपरोक्त नोटीस संबंधीतास पोच करुन या कार्यालयास सादर करावी.

तहसिलदार अमरावती

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या कार्यपध्दतीत सुधारणा करणेस मान्यता देण्याबाबत...

## महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन
निर्णय क्रमांक: किसनि-२०२३/प्र.क्र.४२/११-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १५ जून, २०२३

वाचा :-१) कृषी व पदुम विभाग, राज्य परिपत्रक क्र. कियो- २०१९/प्र.क्र.२०/११-अ, दि. ०४.०२.२०१९.
२) कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कियो- २०१९/प्र.क्र.२०/भाग-४/११-अ, दि. १५.०२.२०१९.

# महसूल विभाग:-

१) भूमी अभिलेख नोंदीनुसार अर्जदार योजने अंतर्गत लाभ घेण्यास पात्र/अपात्र असल्याबाबत पोर्टलवर प्रमाणित करावे
२) भूमी अभिलेखाशी संबंधीत माहिती दुरुस्ती करावी
३) लाभार्थ्यांच्या भूमी अभिलेख नोंदी अदययावत कराव्यात
४) अपात्र लाभार्थीकडून लाभ परतावा वसुल करावा
५) अपात्र लाभार्थीकडून केलेल्या वसूलीबाबत पोर्टलवर माहिती भरावी/अदययावत करावी.
६) अपात्र लाभार्थ्यांकडून वसुल केलेली रक्कम आयुक्त (कृषि) यांचे मार्फत शासनाकडे जमा करावी
७) योजनेंतर्गत भूमी अभिलेख, वसुली व महसूल यंत्रणेशी संबंधीत इतर कामे करावी
iv) ग्रामविकास विभाग:-पीएम-किसान योजनेंतर्गतचा लाभार्थी मयत झाल्यास त्यास पोर्टलवर मयत म्हणून मार्क करण्यासाठी त्याची माहिती तालुका नोडल अधिकारी यांना उपलब्ध करून दयावी.

# जागा मागणी

## जागा मागणी

| अ.क्र. | विषय | | लागणारे कागदपत्रे |
|---|---|---|---|
| | | | **शासकीय जागा मागणी** |
| 1 | शासकीय जागा मागणी | **विषय** :- जागा मागणीचा प्रस्ताव विहित नमुन्यात व संबधित विभागाचे अभिप्रायसह सादर करणेबाबत<br><br>**संदर्भ** :- महसूल अधिनियम १९६६ मधील २० व २२ मधील तरतुदीन्वये | १. शासन पत्र दि. ०९/०२/२०१० नुसार जागा मागणी बाबतचे विहित विवरणपत्र भरुन, अ वर आवेदक विभाग व ब, क, ड तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांची स्वाक्षरीसह |
| | | | २. संबधित गटाचे १९५० पासूनचे मुळ ७ / १२, आखीव पत्रिका, ८ अ व सदर गट बाबत सर्व फेरफार |
| | | | ३. जाहिरनामा प्रसिद्धी अहवाल (तलाठी, तहसिल कार्यालय, संबधित ग्रामपंचायत कार्यालये) |
| | | | ४. मंडळ अधिकारी / तलाठी यांचा स्थळ दर्शक निरीक्षण अहवाल (स्मशानभुमी, मोल्यवान झाडे, धार्मीक स्थळ, वहिवाटीचा रस्ता इ.बाबत) प्रस्तावित जमिनीवर अतिक्रमण असल्यास तपशिल<br>सदर जमीन न्यायप्रविष्ट आहे काय ? मंडळ अधिकारी यांचे स्थळपाहणी पंचनामा कच्चा नकाशासह गावाचा गट नंबर निहाय गटवाटीचा नकाशा ५ % जमीन शिल्लक राहत असल्याबाबत/नसल्याबाबत प्रमाणपत्र |
| | | | ५. मोजणी नकाशासह आवश्यक जागेचे क्षेत्र अनुबंधित करून मुळ नकाशाची प्रत ( क प्रत ) |
| | | | ६. प्रस्तावित जमीन ग्रामीण भागात येत असल्यास ग्राम सभेचा ठराव व ग्रा. प./ ग्रामसभेच्या ठरावावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची शिफारस (CEO) अन्य शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीची आवश्यकता असल्यास गायरान जमीन उपलबध करून देतांना स्थानीक ग्रामपंयातीने तसा स्पष्ट उल्लेख करून ठराव मंजूर करणे व त्या ठरावावर कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची शिफारस असणे आवश्यक राहील. |
| | | | ७. मागणी केलेली जमीन शहरी क्षेत्रात येत असल्यास संबंधित अधिकारी यांचा ठरावासह अहवाल |
| | | | ८. दुय्यम निबंधक विभाग यांचे सदर जमिनीचे चालु बाजारभावानुसार मुल्यांकन अहवाल |
| | | | ९. सहायक संचालक, नगर रचना विभाग यांचा अहवाल/ नाहरकत |
| | | | १०. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अहवाल/ नाहरकत |
| | | | ११. कार्यकारी अभियंता, महराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी यांचा अहवाल / नाहरकत |
| | | | १२. आरोग्य विभागाचे अभिप्राय/ अहवाल |
| | | | १३. वन विभागाचे अभिप्राय/अहवाल |
| | | | १४. भुसंपादन अधिकारी यांचा अभिप्राय/ अहवाल |
| | | | १५. प्रस्तावित प्रकल्पाला राज्य शासनाची रितसर मान्यता (प्रशासकीय मान्यता) असणे आवश्यक |
| | | | १६. यापुर्वी प्रस्तावित जमिनीची मागणी अन्य विभागोच केली आहे काय तसेच इतर कोणत्या विभागास आगाऊ ताबा दिला आहे काय ? |
| | | | सदर प्रकरणाचे यापुढे प्राप्त होणारे जागा मागणीचे प्रस्ताव तहसिलदार यांचेकडून परिपुर्ण प्रस्ताव मा. उपविभागीय अधिकारी यांना सादर करण्यात येते मा. उपविभागीय अधिकारी यांनी प्रस्ताव तपासुन मा.जिल्हाधिकारी यांचेकडे परिपुर्ण सादर करण्यात येतात. तसेच सदर प्रकरणास आगाऊ ताबा करीता मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचे प्राप्त झाल्यानंतर मंडळ अधिकारी यांना ताबा पावती करीता पत्र देण्यात येतात व संबंधीत विभागास आगाऊ ताबा देण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | येतात व आगाऊ ताब्याची प्रत मा.जिल्हाधिकारी अमरावत यांना पुढील कार्यवाही करीता सादर करण्यात येते. |
| **नझुल जागा मागणी** | | | |
| 2 | निवासी प्रयोजनार्थ नझुल जागा मागणी | निवासी प्रयोजनार्थ नझूल जागा मागणी प्रस्तावांबाबत | १) अर्जदार यांचा जागा मागणीचा अर्ज |
| | | | २) शासन पत्र महसूल व वन विभाग दि. ०९.०२.२०१० रोजीचे पत्रासोबतचे विवरणपत्र अ, ब, क व ड मधील माहीती संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार यांचेकडुन परीपूर्ण भरुन त्यावर उपविभागीय अधिकारी यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करुन प्रस्ताव सादर करावे. |
| | | | ३) अर्जदाराकडे निवासी प्रयोजनार्थ इतरत्र जमीन उपलब्ध आहे किंवा कसे? याबाबतचा स्पष्ट अहवाल |
| | | | ४) सर्व संबंधित विभागाचे अभिप्रायासह प्रस्ताव सादर करावा. (उदा. भूमी अभिलेख, नगर रचना विभाग, महावितरण कंपनी, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, जिल्हा पुर्नवसन अधिकारी, प्रभारी अधिकारी भूसंपादन जि.का. अमरावती, जि.प.बांधकाम, ग्रा.पं./ न.प./ म.न.पा (स्थानिक स्वराज्य संस्था) व प्रकरणपरत्वे आवश्यक विभागांचा नाहरकती) |
| | | | ५) . विषयांकित जागेचा अद्यावत स्थळ निरीक्षण अहवाल |
| | | | ६) आवेदकाचे चारीत्रय व पुर्ववृत्ताबाबतचा पोलिस विभागाचा अहवाल |
| | | | ७) चालू आर्थिक वर्षाचे मुल्यांकन अहवाल |
| | | | ८) एखादया जमिनीचा लहान पट्टा समजण्यासाठी आपल्या कार्यालयाकडुन कोणते निकष लावण्यात येतात, याबाबत माहीती देण्यात यावी. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ च्या नियम ३७ मधील तरतूदीनुसार प्रस्तावाधिन लहान पट्याची जागेची स्वतंत्र जागा म्हणून वाजवीरित्या विल्हेवाट लावणे शक्य आहे किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्यात यावे. |
| | | | ९) सदरहू जमीन विकास योजना व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार स्वतंत्रपणे बांधकामाव्दारे विकसीत करण्यास उपयुक्त आहे किंवा कसे, याबाबत अहवाल संबंधित विकास प्राधिकरणाकडुन प्राप्त करुन प्रकरणासोबत सादर करावा. |
| | | | १०) सदर जागा प्रमुख राज्यमार्गालगत असल्यास सदर रस्त्याचे दर्जोन्नती (श्रेणीवाढ) बाबतची सद्यस्थिती राष्ट्रीय महामार्ग विभाग तसेच राष्ट्रीय माहामार्ग प्राधिकरण यांचेकडुन प्राप्त करावी तसेच प्रस्तुत रस्त्याची दर्जोन्नती (श्रेणीवाढ झाल्यानंतर प्रस्तावातील जागा रस्त्यामध्ये जाते किंवा कसे याबाबत अहवाल सादर करावा. |
| | | | ११) प्रस्तावित केलीली जागा एकत्रित ले-आऊट करुन लिलावाने प्लॉट देणे बाबत कार्यवाही करावी. तसे शक्यनसल्यास प्रस्तुत जमीन विनालिलावाने का मंजूर करण्यात यावी, याबाबतची सबळ कारणे सादर करावी. |
| | | | १२) नागा मागणी प्रकरणात काढण्यात आलेला जाहीरनामा संबंधित तहसिल कार्यालय, महानगरपालीका कार्यालय, नगर परीषद कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, तलाठी कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात यावा. |
| | | | १३) जाहिरनामा प्रसिध्द केल्यानंतर त्या बाबतचा सर्व कार्यालयाचा प्रसिध्दी अहवाल तसेच जाहीरनामा प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप / हरकती प्राप्त झाल्या किंवा कसे याबाबतचा अहवाल प्रकरणात जोडण्यात यावा. |
| | | | १४) अर्जदार सदरहू जमीनीचा वापर कोणत्या प्रयोजनासाठी करणार आहे याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. |
| | | | १५) सदरहू जमिनीवर स्वतंत्ररीत्या बांधकाम करता येईल किंवा कसे याबाबत संबंधित विकास यंत्रणेचे / स्थनिक विकास प्रधिकरणाचे अभिप्राय सादर करावेत. |
| | | | १६) उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडील क प्रत सादर करावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १७) सदर प्रस्ताव प्रचलित शासन धोरणानुसार आहे किंवा कसे याबाबतची तपशिलवार माहीती आपले सुस्पष्ट अभिप्रायासह दयावी. |
| | | | १८) प्रस्तावाधिन जमीन अन्य शासकीय / निमशासकीय कार्यालयाच्या वापरासाठीची मागणी प्रलंबित / प्रस्तावित आहे किंवा कसे याबाबतची माहीती सादर करावी. नसल्यास सदरहु जागेची शासकीय / निमशासकीय कार्यालये इत्यादीसाठी आवश्यक्ता नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे. |
| | | | 19) महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम १३ व ३७ मध्ये जमिनीच्या लहान तुकडयाची विल्हेवाट लावण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीनुसार प्रश्नाधिन जमिनीच्या लहान पट्टयाची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावणे शक्य आहे किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्यात यावे. |
| | | | २०) महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ चे नियम ११ जमीन देण्याच्या प्रयोजनामध्ये प्राथम्य देण्यात आलेले आहे. प्रश्नाधिन जमीन मागणीच्या अनुषंगाने एकापेक्ष अधिक अर्ज आले किंवा कसे, असल्यास नियम ११ नुसार कार्यवाही करण्यात आली किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्यात यावे. |
| | | | २१) प्रस्तावाधिन जागेच्या मालमत्ता पत्रकाची सुस्पष्ट साक्षांकित प्रत व त्यावरील फेरफाराच्या प्रती, हक्कनोंदणी व इतर आवश्यक दस्ताऐवजासह साक्षांकित प्रतीत सादर कराव्यात |
| | | | २२) प्रस्तावाधीन जंमीन महानगरपालीका हद्दीमध्ये समाविष्ट असल्यामुळे सध्या किंवा भविष्यात सदरहू जागेची महानगरपालीकेला आवश्यकता आहे किंवा कसे |
| | | | 23) प्रस्तावाधिन जमीन अर्जदार यांना मंजूर करावयाची झाल्यास आपल्या कार्यालयामार्फत कोणत्या अटी व शर्ती ज्ञापनामध्ये समाविष्ट करण्यात याव्यात, त्या अटी व शर्ती या कार्यालयास प्रस्तावासोबत सादर कराव्यात. |
| | | | २४) विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) व त्याकरीता आवश्यक निधी याबाबतची माहीती सादर करावा. |
| | | | २५) महानगरपालीकेचा जमीन मंजूरीबाबतच्या ठरावाची प्रत (आवश्यकतेनुसार) |
| | | | २६)जमिनीची मागणी ज्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे, त्या प्रयोजनासाठी संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र / शिफारस घेण्यात यावी. |
| | | | २७) शासन निर्णय दि. ३०.११.२०12 नुसार किमान आवश्यक क्षेत्राबाबत सक्ष प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे. |
| | | | २८) शासकीय जमीन मंजूरीच्या शासनाच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत शपथपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे. प्रस्ताव महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व महराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ च्या कोणत्या तरतूदीनुसार किंवा शासनाच्या कोणत्या धोरणानुसार सादर करण्यात येत आहे याचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करण्यात यावा. |
| | | | २९) प्रस्तुत जमीन विकास आराखडयात नमूद आहे काय असल्यास त्यावरील आरक्षण काय आहे याबाबतचा अहवाल. |
| | | | ३०) प्रस्तुत जागेला पोच रस्ता उपलब्ध आहे काय ? याबाबतचा स्थळनिरीक्षण अहवाल |
| | | | ३१) प्रस्तुत जमिनीच्या अनुषंगाने मा. न्यायालयात दावा / रिट याचिका प्रलंबित आहे काय, असल्यास त्याची सद्यस्थिती काय आहे. |
| | | | ३२) शासन निर्णय क्र. जमीन/०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१ दि.१२.०७.२०११ मधील तरतूदी तपासून प्रस्ताव सादर करावा. |
| | | | ३३) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो जनहित याचीका क्रमांक २/ २०२२ मधील आदेशान्वये जागा मागणी प्रस्ताव सादर करतांना बाबीची तपासणी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करुनच प्रस्ताव सादर करावा |
| | | | 34) प्रकरणपरत्वे आवश्यक सर्व दस्तऐवज, अहवाल, अभिप्राय इ. प्रस्तावासोबत सादर करावे. |
| **सदर प्रकरणाचे प्राप्त होणारे जागा मागणीचे प्रस्ताव तहसिलदार यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी तपासुन जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे परिपुर्ण सादर करण्यात येतात** | | | |
| 3 | शासकीय जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना जमीन मागणीबाबत | | शासकीय जमीन गायराण/गुरचण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनीक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. जमीन 03/2011/प्र.क्र.53/ज-1, दिनांक. 12 जुलै 2011 मधील तरतुदी नुसार कोणतीही कोणत्याही प्रयोजनासाठी मंजुर करता येत नाही. |
| 4 | केंद्र व राज्य सरकारने सन २०२२ पर्यंत ग्रामीण भागातील सर्व बेघर कुंटुंबांना घरे देण्याबाबत | | सर्वांसाठी घरे-2022 या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमीनी वरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय क्रमांकः प्रअयो-2017/प्र.क्र.348/योजना-10,तारीखः16.02.2018. (शक्ती प्रदत्त समिती) अन्वये देण्यात येतात. |

**मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत प्राप्त प्रस्ताव**
**मा.जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे**

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी न्यास व्यबस्थापन समितीची नियम व विनियम

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय-सीआरएफ २००९/प्र.क्र.१९७/२००१/२५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १५ नोव्हेंबर, २००१

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीआरएफ-१०६७/बी, दिनांक २.३.१९६७.


- 1) पाणी टंचाई अंतर्गत गटविकास अधिकारी यांचेकडुन विहीर/बोअर अधिग्रहणाचे प्राप्त प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी यांना मान्यतेस्तव सादर करणे
- 2) पुनर्वसन अंतर्गत भुखंड वाटप व इतर  कामकाज पाहाणे .
- 3) महसुल आढावा बैठकीची टिपणी तयार करणे.
- 4) क्षतीपुर्ती योजनेअंतर्गत (Hit and Run)प्राप्त प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे.
- 5) अंशकालीन कर्मचारी म्हणुन कामकाज केलेल्यांचे प्रमाणपत्र पडताळणी करुन प्रमाणित करणे.
- 6) प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळणेकरिता गृहचौकशी अहवाल देणे.
- 7) दादासाहेब गायकवाड स्वाभिमान सबळीकरण योजनेअंतर्गत येणारे कामकाज.
- 8) भुसंपादन संबंधित येणारे कामकाज पार पाडणे.
- 9) इतर संकीर्ण कामकाज पार पाडणे.


# -: नायब नाझर यांचा कडील कामकाज :-

1)सामान्य प्रशासन शाखेअंतर्गत येणाऱ्या सर्व विभागांचे देखरेख करणे.
2)सामान्य प्रशासन शाखेअंतर्गत येणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कामकाज करतांना आवश्यक असलेले लेखन सामुग्री व संगणक साहीत्य दुरुस्ती करणे व पुरविणे
3)वेळोवेळी कार्यालयात आयोजित सभा.प्रशिक्षण व्यवस्थाकरणे.
4)सामान्य प्रशासन शाखेअंतर्गत उपलब्ध असलेले व वापरण्यात येणारे सर्व साहित्याची देखरेख करणे व नोंद ठेवणे.अवश्यक असलेला साठा नोंदवही ठेवणे.
5)कार्यालयीन कामकाज करतांना आवश्यकतेनुसार शिपाई कर्मचारी यांची नियुक्ती करणे.
6)राष्ट्रध्वजाची उपलब्धता,देखरेख
7)26 जानेवारी –प्रजासत्ताक दिवस ,01 मे-महाराष्ट्र दिवस व 15 ऑबस्ट –स्वातंत्र्य दिवस करीता तहसील कार्यालय येथे मा.उपविभागीय अधिकारी अमरावती यांचे हस्ते ध्वजारोहण पारपाडणे व समारंभाची पूर्ण व्यवस्था करणे.
8)कार्यालयीन परीसर साफसफाई व स्वच्छता करुन घेणे.
9)कोषागार येथून प्राप्त झालेल्या देयकांचे वितरण संबधित शाखा,विभाग,व्यक्ती ,कर्मचारी भत्ते ,पुरवठादार व यांना अदा व त्याबाबतचे नोंद धनादेश नोंदवही मध्ये घेवून रोखपुस्तक लिहणे.
10)वरीष्ट अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे

# तालुका प्रशासकीय इमारती मध्ये नागरीका करिता सुविधा







- **संकलनाचे नाव:- फौजदारी/आर.आर.सी. व इतर**
- **कर्मचारी यांचे नाव पदनाम** – आशिषकुमार उत्तमराव साव, महसूल सहायक

**आर.आर.सी प्रकरणे :- महसूल वसुली प्रमाणपत्रासंदर्भात (RRC) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, परिपत्रक क्र. महसूल-१०७३/५४२२-सी-१, दिनांक २२.८.१९७४ नुसार, 'महसुली वसूली प्रमाणपत्र' थेट तहसीलदारांकडे पाठवून त्याची प्रत माहितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्याची सूचना आहे, जेणेकरून वसुली जलद होईल. तसेच महाराष्ट्र शासन परिपत्रक 27.03.2012 अन्वये आआरसी प्रकरणांत कार्यवाही करणे.**

- **फौजदारी :-** फौजदारी प्रकरणांअंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांचेकडून निर्गमित करण्यात आलेल्या पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.
- **107 ची प्रकरणे :-** फौजदारी प्रकिया संहिता 1973 चे कलम 107 अन्वये शांतता भंग करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या इस्तेगाशा च्या अनुषंगाने प्रतिबंधक कार्यवाही करणे. सद्यस्थितीत फौजदारी प्रकिया संहिता 1973 ऐवजी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 अंमलात आलेली असून त्यानुसार कलम 107, 116 (3) ऐवजी कलम 126, 135 (3) अंमलात आलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणांत संबंधित जाब देणार यांचेकडून सहा महिन्यांकरीता बंधपत्र स्विकारण्यात येते.
- **भुदान जमीन :-** भुदान यज्ञ अधिनियम 1953 भूदान कायद्यांतर्गत अमरावती तालुक्यातील भूदान वाटप झालेल्या जमीनीबाबत प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करणे
- **अलेप :-** अंतर्गत लेखा परिक्षण पथक, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचे व्दारे या कार्यालयामध्ये करण्यात आलेल्या तपासणीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या लेखा परीक्षण अहवालानुसार लेखा परिच्छेदांची पूर्तता करण्याबाबत कार्यवाही करणे.

- **महालेखापाल :-** मा. महालेखापाल मुंबई व मा. महालेखापाल नागपूर यांचेकडील लेखा परिक्षण अहवालानुसार प्राप्त लेखा परिच्छेदांची पूर्तता करण्याबाबत कार्यवाही करणे.
- **कायदा व सुव्यवस्था :-** अमरावती तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता आवश्यक त्या बाबींबाबत आदेश पारीत करणे. मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडून सण उत्सवाच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत प्राप्त पत्रानुसार कार्यकारी दंडाधिकारी यांची नेमणूक करणे.
- जनगणना :- भारताची 2021 ची जनगणना जी 16 वी जनगणना होती, ती कोविड-19 मुळे 2025 पर्यंत पुढे ढकलण्यात आलेली आहे. 2025 मध्ये होणारी जनगणना ही 2011 नंतरची पहिली जनगणना असेल जी 14 वर्षांनी होत आहे. भारतात जनगणना Census Act 1948 ही नुसार होते. जनगणनेबाबत मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडील प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही करणे.

!! धन्यवाद !!

